श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

"सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाची दारी खुली केल्याने आज आपण सावित्रीच्या लेकी इतक्या मोठ्या प्रमाणात शिकत असलेल्या आपण पाहतो. पण सावित्रीबाईंनी यासाठी घेतलेले कष्ट व सहन केलेला त्रास आजच्या मुलींना माहित नाही .आपण सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त वेगवेगळ्या कार्यक्रमातून त्यांच्या विचाराचा वारसा सर्वांसमोर मांडल्यामुळे आताच्या मुलींना त्याचा आदर्श घेता येईल." असे मत डॉ. एस. एच. आंबवडे यांनी मांडले. त्या श्री वेंकटेश महाविद्यालय ,इचलकरंजी येथे सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. व्ही. ए .माने होते. त्यांनी सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व मुलींना सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयामध्ये अनिता चव्हाण व साक्षी बावडेकर यांनी कविता सादर केल्या तर ऐश्वर्या कांबळे, प्रेरणा सुतार व दिपाली मुरगुडे यांनी एकपात्री प्रयोग सादर केला. तसेच भक्ती गुरव हिने आपल्या भाषणातून सावित्रीबाईंच्या कार्याची ओळख करून दिली. या कार्यक्रमाची प्रस्तावना सबिया बाणदार हिने केली. सूत्रसंचालन व आभार मोहिनीअंचलिया हिने केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील तरुणी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

